# प्रेसनोट

**जुन्या भांडणामुळे तरुणाच्या डोक्यात कोयता मारणा-या जिवे मारण्याचा प्रयत्न करणा-या आरोपींना युनिट ४, गुन्हे शाखेकडून अटक.**

दि. २४/०८/२०१९ रोजी दहीहंडीचा सण साजरा होत असताना सदर भागात राहणारे फिर्यादी व त्यांचा मित्र हे दहीहंडी पाहण्यासाठी गेले होते. दहीहंडी बघत असताना गर्दीमध्ये फिर्यादीच्या मित्राचा धक्का यातील आरोपी संकेत जाधव याला लागला. याच कारणावरुन आरोपी व फिर्यादीच्या मित्राची बाचाबाची सुरु झाली. त्यामध्ये फिर्यादी याने दखल घेवून सदरचे वाद मिटवले होते. "आरोपींनी तुला बघुन घेतो" असे म्हणाले. कार्यक्रम संपल्यानंतर फिर्यादी श्रवण जाधव हे घरी जात असताना सर्जा हॉटेलजवळ आरोपी विनायक गायकवाड, किशोर रामावत, संकेत जाधव हे मोटारसायकलवरुन आले व फिर्यादीच्या लक्षात येण्यापुर्वीच आरोपींनी फिर्यादीच्या डोक्यात कोयता व पाठीत तलवारीने वार करुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला. फिर्यादी जखमी झाल्याने स्थानिक लोकांनी तात्काळ हॉस्पीटलमध्ये ॲडमिट केले होते. त्याबाबत वरील आरोपीविरुध्द चतुःश्रृंगी पो स्टे येथे गुन्हा दाखल झाला.

वरील गुन्हयाचा समांतर तपास युनिट ४ कडील तपास अधिकारी व कर्मचारी हे करीत असताना पोलीस कर्मचारी **विशाल शिर्के व शंकर संपते** यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, वर नमुद गुन्हयातील आरोपी हे हॉटेल अभिमान श्री, सेंट जोसेफ स्कूलसमोर, पाषाण रोड, पुणे येथे नातेवाईकांची वाट पाहत थांबलेले असून ते बाहेरगावी पळून जाणार आहेत अशी खात्रीशिर माहिती मिळाल्याने बातमीप्रमाणे बातमीच्या ठिकाणी जावुन वरील आरोपींना शिताफिने पकडून त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी आपली नावे **१. विनायक सुनिल गायकवाड, वय-२५ वर्षे रा. पाषाण गांव, ढेरे कॉलनी, पुणे-२१, २. किशोर लक्ष्मण रामावत, वय-२४ वर्षे रा. संजय गांधी वसाहत, लमाण तांडा, पाषाण, पुणे, ३. संकेत राजू जाधव, वय-२०, रा. इंदिरा वसाहत, गणेशखिंड रोड, औंध, पुणे** अशी असल्याची सांगितली. त्यांनी दाखल गुन्हयाची कबुली दिल्याने त्यांना ताब्यात घेवून पुढील तपासकामी चतुःश्रृंगी पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे.

यातील विनायक सुनिल गायकवाड हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असून, त्याचे विरुध्द शरीराविरुध्दचे गुन्हे दाखल आहे. त्यास यापुर्वी तडीपार सुध्दा केले आहे.

सदरची कारवाई ही मा. अपर पोलीस आयुक्त श्री अशोक मोराळे, मा पोलीस उप आयुक्त श्री बच्चन सिंह, पोलीस निरीक्षक श्री अंजुम बागवान यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक विजय झंजाड, निलेशकुमार महाडिक, पोलीस कर्मचारी, सुनिल पवार, सचिन ढवळे, विशाल शिर्के, शंकर संपते, गणेश काळे, शंकर पाटील, शितल शिंदे यांनी केली आहे.

# प्रेसनोट

दि.२७/०८/२०१९

## तडीपार गुन्हेगारांवर युनिट ४,गुन्हे शाखेकडून कारवाई

पुणे शहरात आगामी विधानसभा मतदान, गणेशोत्सव,नवरात्र इ.महत्वाच्या सणाच्या अनुशंगाने पुणे शहराचे वेगवेगळया ठाण्याच्या हददीतून गुन्हेगारांना तडीपार केलेले आहे तसेच इतर प्रतिबंधात्मक कारवाई चालू आहे.

काळे मा श्री अशोक मोराळे,अपर पोलीस आयुक्त सो, गुन्हे,पुणे शहर यांना माहिती मिळाली की, तडीपार केलेले गुन्हेगार हे तडीपार केलेल्या ठिकाणी न राहता ते पुणे शहरात आपले अस्तित्व लपवून रहात आहे. त्याबाबत मा अपर पोलीस आयुक्त सो,गुन्हे,पुणे यांनी गुन्हे शाखेचे सर्व युनिट शाखा सदर तडीपार गुन्हेगाराचा शोध घेवून कारवाई करणेबाबत आदेश दिले आहेत.

त्याप्रमाणे गुन्हे शाखा युनिट ४ कडील पोलीस कर्मचारी राजू मचे यांची तडीपार गुन्हेगारांचा शोध घेणेकामी खास नेमणूक केली. त्याप्रमाणे त्यांनी त्यांच्या बातमीदारामार्फत माहिती घेवून सापळा रचून ०४ दिवसांच्या आत खडकी पोलीस स्टेशन व शिवाजीनगर पोलीस स्टेशन यांचेकडून तडीपार केलेले खालील गुन्हेगारांची माहिती घेवून सापळा रचून ताब्यात घेतले

१. महेश दिलीप गोरे,वय २० वर्षे रा.पवळे चाळ,डॉ राजेंद्रप्रसाद शाळेमागे,बोपोडी,पुणे हा मैला शुध्दीकरण,बोपोडी,पुणे या ठिकाणी मिळून आला.
२. आशिष संजय लोखंडे,वय २२ वर्षे,रा. स नं २६, बोपोडी,पुणे हा मातृभुमी गणेशमित्र मंडळाजवळ, बोपोडी,पुणे या ठिकाणी मिळून आला.
३. हैदर हुसेन ऊर्फ शफान इराणी,वय २३ वर्षे, रा. विष्णुकृपा तरुण मंडळ, शिवाजीनगर एस टी स्टॅन्डमागे, इराणी वस्ती,शि नगर,पुणे हा शिवाजीनगर एसटी स्टॅन्ड समोरील येवले चहा समोर,शि नगर,पुणे येथे मिळुन आला.

वरील ०३ तडीपार गुन्हेगारांविरुध्द कर्मचारी राजू मचे यांनी ते विनापरवाना कार्यक्षेत्रात मिळुन आलेबाबत संबधित पोलीस स्टेशनला फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

सदरची कारवाई ही मा. अपर पोलीस आयुक्त श्री अशोक मोराळे, मा पोलीस उप आयुक्त श्री बच्चन सिंह, पोलीस निरीक्षक श्री अंजुम बागवान यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी राजू मचे, शंकर पाटील,सचिन ढवळे, गणेश काळे, अतुल मेंगे,राकेश खुनवे यांनी केली आहे.